I0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** फलटण शहर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0588  **Year (वर्ष):** 2022
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/12/2022 02:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 27/12/2022
      **Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2022
      **Time From (वेळेपासून):** 17:15 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:15 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 28/12/2022  **Time (वेळ):** 02:30 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 003
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/12/2022 02:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** फलटण तहसिलदार कार्यालयाचे, आवारात सेतु कार्यालयाचे ,शेजारील पत्र्याचे शेडखाली, 415523

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुरेश रामचंद्र भोईटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आरडगांव ,ताफलटण जि सातारा,फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,415523, भारत |
| 2 | स्थायी पता | आरडगांव ,ताफलटण जि सातारा,फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,415523, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9834545413

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाळु निवत्ती गावडे | | | 1. प्लट नं 3,अष्टविनायक रो हाऊस,सोसायटी, प्रगती नगर, टीसी कलेजच्या पाठीमागे, बारामती शहर ता बारामती, बारामती,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 28/12/2022
मी, सुरेश रामचंद्र भोईटे, वय 46 वर्षे, शिक्षण - बी ए बी एड, व्यवसाय - नोकरी, शिपाई, श्रीमानशेठ गणपतराव सुर्यवंशी विद्यालय तांबवे ता.फलटण जि.सातारा, रा. मु.पो. आरडगांव ता.फलटण जि. सातारा मोबाईल नंबर 9834545413

मी दिनांक 27/12/2022 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सातारा येथील पोलीस निरीक्षक श्री. सचिन राऊत साहेब यांचेशी संपर्क साधुन त्यांना फलटण येथे बोलावुन त्यांची सातारा फलटण रोडवर समक्ष भेट घेवुन मला होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगितली. माझ्या तक्रारीनुसार पुढील कार्यवाही करण्याकरीता श्री. सचिन राऊत साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकाची एकमेकांस ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि. राऊत साहेब यांचे सुचनेनुसार मी, माझी तक्रार दोन्ही पंचांना सांगितली की, माझे पत्नीचे विजेचा शॉक लागुन 11 एप्रिल 2022 मध्ये निधन झाले होते. त्याबाबत फलटण कृषी विभागातील श्री.गावडे साहेब, कृषी पर्यवेक्षक यांनी माझ्या पत्नीचे विम्याचे प्रकरण वरीष्ठ कार्यालयास पाठविण्यासाठी माझ्याकडे एकुण 10,000/- रुपयांची लाच मागणी केली असुन मला दिनांक 27/12/2022 रोजी भेटण्यासाठी बोलविले आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी हि विनंती अशी तक्रार सांगितली व तशी मी, सविस्तर तक्रार हस्तलिखीत नोंदविली.

त्यानंतर श्री.राऊत साहेब यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवुन त्याची संपुर्ण माहिती देवुन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर मला व पंच नं.1 श्री. राऊत यांना पो.नि. राऊत साहेब यांनी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डरसह माझ्याकडील चारचाकी वाहनाने पंच नं.1 यांना माझ्या सोबत कृषी पर्यवेक्षक श्री.गावडे साहेब यांची भेट घेण्यासाठी फलटण शहरातील तहसिलदार कार्यालयाचे परीसरातील तालुका कृषी विभागाचे कार्यालयात 12.24 वाजण्याचे सुमारास पाठवून दिले. सदर ठिकाणी माझी व कृषी पर्यवेक्षक श्री. गावडे साहेब यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी माझेत व श्री.गावडे साहेब यांचेमध्ये माझ्या मयत पत्नीचे विम्याचे प्रकरणाबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी श्री. गावडे साहेब यांनी माझ्या, मयत पत्नीचे शेतकरी अपघात विमा योजना प्रकरण मंजुरीकरीता पुढे पाठविण्यासाठी व शासनाकडुन मिळणारा 2 लाख रुपये विम्याची रक्कम माझ्या बँक खात्यावर जमा करणेसाठी 10000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लागलीच तालुका कृषी अधिकारी कार्यालय फलटण येथे आणुन देण्यास सांगितली. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे पथक थांबले ठिकाणी 13.05 वाजण्याचे सुमारास परत आलो. त्या ठिकाणी पो.नि.राऊत साहेब यांन माझ्याकडील रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर मला व पंच नं. 1 यांना हकिकत विचारुन तसेच रेकॉर्डरमधील हकिकतीवरुन कृषी पर्यवेक्षक श्री. गावडे साहेब यांनी माझ्याकडे 10,000/- रुपयांची लाच मागणी केल्याची पो.नि. राऊत साहेब व दोन्ही पंचांची खात्री झाली.

त्यानंतर पो.नि. राऊत साहेब यांनी सापळा कारवाईचे आयोजन करुन मला, 10,000/- रुपये लाच रकमेची व्यवस्था करण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी, 10,000/- रुपयांची व्यवस्था करुन ती लाच रक्कम पो.नि. राऊत साहेब यांचेकडे हजर केली. त्यानंतर पो.नि. राऊत साहेब यांनी सापळा कारवाईला जाण्यापुर्वी मला व दोन्ही पंचांना अंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिवा दाखवुन त्याबाबत सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यानंतर पथकातील पोलीस कॉन्स्टेबल भोसले यांनी 10,000/- रुपये लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रीया शासकीय वाहनात करुन आयोजीत केले सापळा कारवाई संबंधने, श्री. राऊत साहेब यांनी मला, दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. राऊत साहेब यांचे

सुचनेनुसार कृषी पर्यवेक्षक श्री. गावडे यांचा ठावठिकाणा घेण्यासाठी मी, साधारणत: 16.45 कृषी पर्यवेक्षक यांना फोन केला. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देवुन पंच नं.1, यांना माझ्या सोबत माझ्याकडील चारचाकी वाहनातुन कृषी पर्यवेक्षक श्री. गावडे साहेब यांची भेट घेण्याकामी रवाना केले.
मी व पंच नं. 1 श्री. राऊत असे माझ्या चारचाकी वाहनामधुन जावुन तालुका कृषी कार्यालय, फलटणचे समोरील पार्किंगमध्ये वाहन पार्क केले. पो.नि.राऊत साहेब व सापळा पथक असे शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ येवुन सदर कार्यालयाचे परिसरात काही अंतरावर शासकीय वाहन लावुन वाहनातुन उतरुन कार्यालयाचे आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशा रीतीने थांबुन राहीले. त्यानंतर आम्ही दोघेजण कार्यालयात कृषी पर्यवेक्षक गावडे साहेब बसले ठिकाणी गेलो. त्याठिकाणी माझी व कृषी पर्यवेक्षक गावडे साहेब यांची समक्ष भेट झाली त्यावेळी आमचेमध्ये कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी गावडे साहेब यांनी त्यांचे हाताने इशारा करुन माझ्याकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी मी माझ्याकडील 10,000/- रुपये लाच रक्कम काढुन गावडे साहेब यांचे समोर धरली. त्यावेळी गावडे साहेब यांनी त्यांचे हातातील गुलाबी रंगाची पिशवी खोलुन "ठेवा त्याज्यात" असे म्हणुन मला, माझ्या हातातील लाच रक्कम पिशवीमध्ये ठेवण्यास सांगितली. त्यावेळी मी, माझ्याकडील 10,000/- रुपये रक्कम गावडे साहेबांच्या हातातील गुलाबी रंगाचे पिशवीत ठेवली. त्यानंतर मी, "ओके ओके ओके" असे म्हणुन त्यांचे पासुन बाजुला येवुन माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारण्याचा इशारा केला.
तो इशारा पाहुन पो.नि. राऊत साहेब व पथक माझ्या जवळ येवुन त्यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर पो.नि. राऊत साहेब व पथकाने सदर ठिकाणाहुन कृषी पर्यवेक्षक श्री. गावडे साहेब यांना ताब्यात घेतले. त्यानंतर श्री. गावडे साहेब यांना घेवुन सापळा पथक, मी असे सर्वजण तालुका कृषी अधिकारी कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी पो.नि. राऊत साहेब यांनी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील कारवाईसाठी फलटण शहरातील शासकीय विश्रामगृह येथे गेलो. त्या ठिकाणी पो.नि. राऊत साहेब यांचेकडुन मला, लोकसेवक गावडे यांचे संपर्ण नाव, पद व पत्ता याबाबत सविस्तर माहिती समजली. त्या ठिकाणी सविस्तर पचंनामा करुन कारवाई पुर्ण केली. सदरबाबत सविस्तर यशस्वी पंचनामा शासकीय विश्रामगृह फलटण येथे टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे.

तरी दिनांक 27/12/2022 रोजीचे 12.24 ते 13.05 या वेळी पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक बाळु निवृत्ती गावडे, वय 52 वर्षे, पद - कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय फलटण रा. प्लॅट नं. 3 अष्टविनायक रो हाऊस सोसायटी, प्रगती नगर टीसी कॉलेजच्या पाठीमागे, क्रियेटीव्ह ॲकेडमी शेजारी, बारामती शहर ता.बारामती जि.पुणे यांनी स्वत:चे पदाचा दुरूपयोग करुन माझ्या मयत पत्नीचे शेतकरी अपघात विमा योजना प्रकरण मंजुरीकरीता पुढे पाठविण्यासाठी व शासनाकडुन मिळणारे 2 लाख रुपये विम्याची रक्कम माझ्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी 10,000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम दिनांक 27/12/2022 रोजी 17.15 वाजणेचे सुमारास सापळा कारवाईमध्ये फलटण तहसिलदार कार्यालयाचे आवारात सेतु कार्यालयाचे शेजारील पत्र्याचे शेडखाली माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द तक्रार आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आला असुन तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पहिला तो माझ्या सांगण्या प्रमाणे बरोबर आहे.

ही खबर दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dadabhau sahebrao pawar(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dadabhau sahebrao
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pi

पोलीस ठाणे अंमलदार
फलटण पोलीस स्टेशन